# शेतकरी संघटक

पाक्षिक

वार्षिक वर्गणी रु. २५

किंमत १ रुपया

वर्ष ९ वे | ६ एप्रिल १९९२ शेतकरी हुतात्मा स्मृतिदिन | अंक १ ला


# सीतेचे उदाहरण हाच प्रभावी मार्ग आहे

**— शरद जोशी**

३० मार्च १९९२

**आदरणीय ठाकुरदासजी,**

आपली २१ व २३ मार्चची दोन्ही पत्रे मिळाली. माझ्या आईच्या मृत्यूसंबंधाने आपण जी संवेदना व्यक्त केली त्याबद्दल मी ऋणी आहे.

लक्ष्मी मुक्तीच्या कार्यक्रमाला जो काही प्रतिसाद आणि उत्साह मिळतो आहे त्याने मीही काहीसा भारावून गेलो आहे. एका वर्षाच्या आत २ लाखावर शेतकऱ्यांनी आपल्या पत्नीच्या नावाने जमीन करून द्यावी एवढेच नव्हे तर त्याबद्दल सणासुदीच्या हर्ष-उल्हासाने उत्सव साजरा करावा हे माझ्या समजण्यापलिकडचे आहे. आजपर्यंत ६५० गावांमध्ये जाऊन लक्ष्मीमुक्ति केल्याबद्दल गावांचा सन्मान करण्याचा कार्यक्रम मी करून आलो. तरीही मला हे गूढ उकलले नाही. यातून केवळ जमिनीच्या मालकीहक्कात बदल होतो आहे असे नाही तर ग्रामीण स्त्रीच्या आत्मविश्वासात आणि पारिवारिक जीवनांत फार मोठा बदल घडतो आहे. हे आंदोलन पुढे नेणे आता माझ्या ताकदीच्या बाहेरचे आहे. त्याला कुणी समर्थ कर्णधार भेटेल अशा अपेक्षेत मी आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील रावेरी गावांत केवळ योगायोगाने मी गेलो आणि सीतेच्या वनवासातील हलाखीची कथा कानावर पडली. रामाविषयी अनेकांच्या भावना मोठ्या नाजुक आहेत. गांधीवादी म्हणून आपल्याही तशा असणारच. लक्षावधी अर्थवादी कार्यकर्त्यांना जो जमला नाही तो उत्पात रामाच्या मंदिराच्या नांवाने घडला आहे. तरी देखील सीतेच्या या कहाणीने लक्षावधी स्त्रीपुरुषांचे डोळे पाणावलेले मी पाहतो आहे. किंबहुना स्त्रियांच्या मालमत्तेच्या हक्काची प्रभावी मांडणी करण्यासाठी यापेक्षां दुसरे योग्य उदाहरण मिळणे कठीण आहे.

रामावर हल्ला चढवण्याचे मला तसे काही कारण नाही. इतिहासात जमा झालेले प्रेषित आणि अवतार हे त्यांच्या स्थलकालाच्या मर्यादित दैदीप्यमान व्यक्तिमत्त्वाचे असामान्य पुरुष होऊन गेले याला काही कुणाच्या मान्यतेची आवश्यकता नाही. पण पूर्वकालातील किंवा इतिहासातील पुरुषोत्तमांविषयीच्या आदरभावनेचा प्रचलित क्षुद्र राजकीय स्वार्थासाठी कोणी उपयोग करू लागला तर त्याला उत्तर काय?

धर्मवाद्यांना प्रत्युत्तर म्हणून मार्क्सवाद्यांनी निर्धार्मिकतेचा पवित्रा घेतला. त्या पवित्र्याचे अपयश हिंदुस्थानातच नव्हे तर अगदी पार सेव्हियट रशियाच्या पतनातही स्पष्ट झाले आहे. साम्यवादाच्या विक्राळ राजवटीविरूद्ध अर्थवाद्यांनी उभा केलेला बंडाचा झेंडा कुठे यशस्वी झाला नाही. पूर्व

## लक्ष्मीमुक्ती – अर्ध्या मानवजातीचे अश्रू पुसणारे आंदोलन

**श्री. ठाकुरदास बंग, (सर्व सेवा संघ) गोपुरी, वर्धा**

**२१-३-९२**

***प्रिय शरदराव,***

***नमस्कार,***

***२१ फेब्रुवारीच्या 'शेतकरी संघटक' च्या अंकात मी आपले 'लक्ष्मीमुक्ती मंगल सावकाराचे देणे'' हे भाषण वाचले. यांतील संयुक्तिकतेमुळे व भावनेच्या ओलाव्यामुळे मी अगदी भारावून गेलो. तुम्ही हे स्वैच्छिक आंदोलन उभारून अर्ध्या मानवजातीचे अश्रू पुसण्याचा भरीव अद्वितीय कार्यक्रम सुरू केला आहे. याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन. सीतेच्या वनवासाचा संदर्भ न देतां तुम्ही हे मांडू शकलात तर आणखी चांगल होईल. असो. देशभर हा कार्यक्रम जावयास हवा. सर्वोदय जगतात मी याचा प्रचार, प्रसार करनच. मी श्री. वसंतराव बोंबटकर व श्री. पेंटे यांना हा अंक वाचावयास दिला. दोघांनाही हा कार्यक्रम मनस्वी आवडला. यावर्षी, योगायोगाने अखिल भारतीय सर्वोदय संमेलनाच्या अध्यक्षीय भाषणातूनही मी या कार्यक्रमाचा पुरस्कार करीन म्हणतो.***

***पुन्हा एकदा तुमचे हार्दिक अभिनंदन. तब्येत बरी असेल.***

**आपला,**

**ठाकुरदास बंग**

युरोपातील चर्च आणि मध्य आशियातील इस्लाम ह्या जुन्या संस्था, थडग्यातून भूत उठून उभे रहावे तशा उभ्या राहाताहेत.

जुन्या संघटित धर्माच्या विषाला उतारा कोणता? त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालत नाही. त्यांचा द्वेष करूनही चालत नाही. या धर्मांनी समाजाला काही अस्मिता म्हणा, एकसंघता म्हणा, दिली तोडीस तोड असे कांही समांतर आपण काही देऊ शकत नाही तोपर्यंत धर्माचा रागराग केल्याने काही जमणार नाही.

भारतात तर परिस्थिती आणखी विशेष कठीण आहे. एका राष्ट्रवंदित महात्म्याने धार्मिकतेचा किंवा धर्मसंकल्पनेचा राष्ट्रीय चेतना निर्माण करण्यासाठी येथे जाणीवपूर्वक प्रयोग केला आहे. रामाविषयी कोणाही अभ्यासकाला मान्य न होण्यासारखे अवास्तव पूर्णत्वाचे गुण चिकटवले आहेत. महात्माजींच्या मृत्यूनंतर कठमुल्लांची पिछेहाट झाली असे काही थोडा काळ वाटले पण मुल्लामहंताच्या आजच्या व्यापक आघाडीचे जे दृष्य आपल्याला समोर दिसते आहे त्याची जबाबदारी महात्माजींवर फार मोठ्या प्रमाणावर पडते.

या विषयावर मी यापूर्वी आपल्याशी बोललो आहे. माझी मांडणी आपल्याला पटावी अशी माझी अजिबात अपेक्षा नाही. पण एका गोष्टीचा उल्लेख आवर्जून करावासा वाटतो. महात्माजी हे फार मोठे सेनापती होते अशी मांडणी मी अनेक ठिकाणी केली आहे. आपल्यासमोरही केली आहे. हतबल, दरिद्री, अडाणी कोट्यावधी जनतेला जगातील सर्वात बलाढ्य साम्राज्यशाहीविरूद्ध उठण्यास महात्माजींनी तयार केले. त्यासाठी एक नैतिकता आणि त्या नैतिकतेतून निघणारे सत्याग्रह आणि सविनय कायदेभंग हे हत्यार ही त्यांची रणनीती होती. पंजाबमधील प्रख्यात शेतकरी नेते सर छोटूराम महात्माजींचे मोठे चाहते होते, पण त्यांनीही महात्माजींना सार्वजनिक आयुष्यात धर्मसंकल्पना आणि कायद्याविषयीचा अनादर आणण्याविरुद्ध धोक्याची सूचना दिली होती. देशातील आजच्या अराजकास आणि मूलतत्त्ववाद्यांच्या पुनरुत्थानास महात्माजींची रणनीती जबाबदार आहेच आहे. मुद्याचा विषय असा की, हिंदुस्थानात रामाचा व्यापार मांडणाऱ्यांविरूद्ध आघाडी उघडणे महाकर्म कठीण.

आश्चर्य म्हणजे अडवाणींची रथयात्रा चालू असतांनादेखील माझी सीताकथा लोकांनी मोठ्या सहृदयतेने ऐकली आणि तीला दादही दिली. धर्ममार्तंडाविरूद्ध प्रभावी उपाय म्हणजे धर्मांचे समग्र आणि व्यासंगी परिशीलन असे माझे मत आहे. रामाविषयीची भारतीयांची बहुतेक मते ही तुळशीदास किंवा भक्तिपंथातील रामायणांवरून बनली गेली आहेत. इतर शेकडो रामायणे जवळ जवळ पूर्णपणे दडपली गेली आहेत. लोककथेतील, विशेषतः स्त्री गीतातील आणि जैन साहित्यातील रामायणाविषयी जवळ जवळ अज्ञानच आहे. रामाने सीतेवर घोर अन्याय केला यात काही संशयाला जागा नाही. शेतकरी संघटकच्या गेल्या काही अंकात खुद्द वाल्मिकी रामायणातील उतारे दिले गेले आहेत. सीतेविषयीची रामाच्या मनातील घृणा ही वाल्मिकी रामायणातही स्पष्ट होते. मी तुझा स्वीकार करणार नाही हे रामाचे म्हणणे हा प्रशंसेचा विषय होऊ शकत नाहीच, पण तिला 'तुझ्या इच्छेप्रमाणे भरत, लक्ष्मण किंवा सुग्रिवाबरोबर राहू शकतेस असे सांगणे प्राकृत प्राकृत आहे. रामाचा स्वार्थी आणि व्यापारी उपयोग करण्याचा कुणी प्रयत्न केला नसता तर इतिहासातील करूण कथा म्हणून नोंद होऊन बाजूला होता आले असते. पण रामाचा कुणी पुरुषोत्तम म्हणून गवगवा करू लागला तर निदान वाल्मिकीइतकी वस्तुनिष्ठता स्वीकारणे अपरिहार्य होईल.

जनपरंपरेने त्राटिका आणि शूर्पनखा यांना तर राक्षसी आणि हास्यास्पदच बनवले आहे. वालीवरील अन्यायामुळे कोणाला फारसे दुःख होत नाही. केवळ तपाचरण केले म्हणून शंबूकाचा शिरच्छेद झाला याचाही कुठे काही परिणाम दिसत नाही. सीतेच्या कहाणीने लोकांच्या डोळ्यात आजही पाणी उभे रहाते. ही तिची पुण्याई आहे. अगदी मंडल आयोगाच्या दिवसांत शंबूकाचे नाही तर सीतेचे नांव जनसामान्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला हात घालते, हे मी अनुभवले आहे.

रामायणाची सर्व कथा हीच मुळी पुरुषसत्तेची सुरुवात आहे अशी अनेकांनी विस्तृत विवेचने केली आहेत. महाराष्ट्रांत धुळ्याचे शरद् पाटील यांनी यासंबंधी उदंड लिहिले आहे. त्राटिका, शूर्पनखा या राक्षसी होत्या ही पोराबाळांना सांगायची भाकडकथा झाली. आर्यांच्या आक्रमणाला तोंड देणाऱ्या स्त्रीप्रधान शेतीसमाजाच्या त्या नायिका होत्या ही मांडणी त्यापेक्षा जास्त मनाला आणि तर्काला पटणारी दिसते. पण शूर्पनखा अगदी राक्षसी होती असे मानले तरी रामलक्ष्मणाने केलेली चेष्टा ही काही कोणाही पुरुषोत्तमास भूषणावह नाही. किंबहुना, रामायणातील मूळ अन्याय कोणता? शूर्पनखेचे नाक कान कापणे हा की सीताहरण हा? याबद्दल मोठा वाद आहे. राम-रावण युद्धात राम जिंकला म्हणून सीताहरणाला विशेष महत्त्व आहे. आणि प्रतिशोधाची एक कृति मूलभूत पाप ठरली.

वास्तविक पाहता आपणासारख्या-समोर ही असली चर्चा करण्याचा माझा अधिकारही नाही. पण सीतेच्या वनवासाचा हृदय हेलावून टाकणारा प्रसंग सांगितल्यावर आपल्यासारख्यांची सहानुभूती सीतेकडे जात नाही, रामाच्या बदनामीची जास्त चिंता वाटते याचा मला खेद वाटतो.

सीता-त्याग हा न्याय्य का अन्याय्य हा विषय मी मांडलेला नाही. सीता-त्याग करायचे ठरल्यानंतर सीतेची राहण्याची अलग यथायोग्य व्यवस्था राम करू शकला असता. तिला वनवासी बनवण्याचे काहीच कारण नव्हते. आणि गर्भारशी स्त्रीस वनवासास पाठवण्याचा आणि बाळंतपणानंतर पसाभार गव्हासाठी भीक मागण्याचा प्रसंग तिच्यावर आणणे हे सर्व प्रकरण हा स्त्रियांच्या मालमत्तेच्या प्रश्नाशी अगदी जवळचा आहे. आजही लक्षावधी स्त्रिया अशाच सीतामाई बनतात हे मांडण्याचा सीतेचे उदाहरण हा एक प्रभावी मार्ग आहे.

आपण काही दुसरे उदाहरण सुचविल्यास त्याचाही उपयोग करता येईल.

पत्रांबद्दल पुन्हा एकदा धन्यवाद.

आपला,

**शरद जोशी**

## स्त्रियांच्या शोषणाचा हिशोब माझे सर्व भाऊ करतील का?

**श्री. शरद भाऊस,**

सप्रेम नमस्कार वि. वि.,

पत्र लिहिण्यास कारण की, भाऊ मी 'शेतकरी संघटक' मधील 'लक्ष्मीमुक्ती : मंगल सावकाराचे देणे' हा लेख वाचला. तसे घरी पाक्षिक माझ्याच नावे येत असल्यामुळे नेहमीचे सर्वच लेख मी अगत्यपूर्वक वाचते. सदरहू लेख अत्यंत आवडला. ''ग्रामीण स्त्री'' शोषणाचे तो एक अध्यायच आहे.

महात्मा फुल्यांनी त्या काळात अनेक संकटांना सामना देऊन स्त्रियांच्या या अंधकारमय जीवनाला प्रथम थोडाफार उजेड दाखवला. स्त्री- शिक्षणाला फुल्यांनी चालना दिली नसती तर आज जी शहरी स्त्री थोडी-फार नोकरी-धंद्यामध्ये राहून स्वावलंबी जीवन जगण्याचा अधिकार सांगते ते तिला शक्यही झाले नसते. ती पण खेड्यात राहणाऱ्या सरंजामशाहीच्या पगड्याखालील जातीव्यवस्था व पुरूषी वर्चस्व याच्यात भरडल्या जाणाऱ्या स्त्रीप्रमाणे राहिली असती. पण वाईट याचे वाटते की आजची ''शहरी स्त्री'' एकदाही फुल्यांची आठवण काढीत नाही, किंबहुना आपल्या विषयीच्या फुल्यांच्या कार्याची पुसटशीही कल्पना तिला नाही, की कोणी होऊ देत नाही?

बाबासाहेब आंबेडकरांनी देखील हिंदू स्त्रियांच्या दास्याचे ऐतिहासिक विश्लेषण करून स्त्री-मुक्तीचा कायदेशीर प्रयत्न अयशस्वी ठरल्यावर (हिंदू कोड बील) मंत्रीपद झिडकारले होते असे माझ्या वाचनात आले. तेव्हापासून स्त्रिया अधिक शिक्षण घेऊ शकल्या. परंतु डॉ. आंबेडकरांच्या या महान कार्यास जातीव्यवस्थेच्या प्रथेमुळे आजच्या सुशिक्षित स्त्रिया विसरतात.

आजची 'स्त्री-मुक्ती संघटना किंवा चळवळ' तर ग्रामीण स्त्रियांसाठी कोणतेच कार्य करतांना आढळत नाही. तिचे थोडे-फार कार्य शहरापुरते मर्यादित स्वरूपाचे आहे. या संघटनेने थोडा जरी शेतकरी संघटनेच्या स्त्री-विषयक दृष्टिकोनाचा अभ्यास केला तर त्याला वेगळी दृष्टी प्राप्त होईल.

भाऊ, तुम्ही आम्हा ग्रामीण स्त्रियांचे फुले-आंबेडकर आहात. आमच्या शोषणाची वही-पेन्सिल तुम्ही घरधन्याच्या हातात दिली व आमचा घरकामाचा व शेतीकामाचा हिशोब लिहिण्यास सांगितला. परंतु माझे सर्व भाऊ हे पुण्य काम करतील का? केले तर त्याचेही यात भलेच आहे. कारण खोलवर जाऊन विचार केला तर यातच ''शेतीमालाच्या उत्पादनखर्चाचा'' भाव दडून बसला आहे.

एकंदरीत शेतकरी संघटनेचा सुरवातीच्या म्हणजे चाकणचे कांदा आंदोलन, दूध आंदोलन, परभणीचे अधिवेशन या सर्व गोष्टीची आठवण झाली म्हणजे शेतकरी संघटनेचे कार्य शेतीमालापुरतेच आहे असे मला वाटायचे. परंतु नंतरच्या चांदवड महिला अधिवेशनाने दिशा बदलली व नंतर आपण ''ग्रामीण स्त्री – शोषणाच्या विरोधा'' चे जनक बनलात. आता तर ''लक्ष्मीमुक्ती कार्यक्रम'' राबवत असून ग्रामीण स्त्रियासाठीचे आतापर्यंत कधी न झालेले आगळे वेगळे हे कार्य आहे. यावरून शेतकरी संघटनेची केवळ शेतीमालापुरतीच बांधीलकी नाही तर ती आर्थिक, सामाजिक, राजकीय अशी नवी वैचारिक स्वरूपाची क्रांती आहे. आजचे सर्वच विचारवंत जर संघटनेच्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करतील तर हा देश-सुजलाम्-सुफलाम् झाल्याशिवाय राहणार नाही.

शेवटी पुन्हा एकदा लिहावेसे वाटते की, आज ज्या ग्रामीण स्त्रिया जिल्हा-परीषद व पंचायत समित्या यामध्ये ३० टक्क्याने का होईना, कोणत्याही पक्षाच्या का असेना, (मग त्या काही पुढाऱ्यांच्या घरच्या का असोत) गेल्यात हे ग्रामीण स्त्रीला एक सुसंधी देण्याचे काम तुम्ही केलेत. सरकारने अनेक युक्त्या-प्रयुक्त्या करून त्यांची टक्केवारी ३० वर ठेवली का असेना पण त्याचे संपूर्ण श्रेय तुम्हालाच. अर्थात भविष्यात मग ही टक्केवारी पुढे नेण्याचे काम आमचे. कारण एकंदरीत लोकसंख्येच्या मानाने आम्ही स्त्रिया निम्म्या आहोत. परंतु हा लढा लढण्यासाठीही होऊन गेलेले फुले-आंबेडकर आणि आता फक्त एकच एक ''शरद भाऊ''. कळावे,

आपली छोटी बहीण

दि. १६.३.९२ **सौ. सविता राठोड**

मु. पो. बेलोरा, ता. परतुर जि. जालना.

## माजघरशेती व व्यापारशेतीचा फायदा घेणारा शेतकरी

श्री. श्रीमंत भीमराव अहमदाबादे मु. भातांब्रा पो. भालकी (जि. लातूर) येथील शेतकरी असून ते दहा वर्षापासून उसाची गाळणी घरीच करतात व गूळ विकतात. १० नोव्हेंबरच्या शेगावच्या कार्यक्रमांत जाहीर झालेल्या चतुरंग शेतीच्या कार्यक्रमांचा खुलासा वाचून त्याचा सविस्तर अभ्यास करून माजघर शेती व व्यापार शेती ह्या शेतकरी संघटनेच्या कार्यक्रमांप्रमाणे गुळाच्या मोठ्या ढेपी (डाग) बनवण्यापेक्षा, लहान एक किलो वजनाच्या वड्या करून बाजारात नेण्याचे ठरवले. ठरवल्याप्रमाणे अर्धा ट्रक मोठे डाग व अर्धाट्रक लहान वड्या प्लास्टिक पिशवीत ठेवून खपटी कार्टूनमध्ये ४० वड्या ठेवून जळगावच्या मार्केटला गूळ नेला. तेथे मोठे असलेले डाग ४२५ रु. क्विंटलप्रमाणे विकले गेले व लहान वड्या असलेला गूळ ५५० रु. प्रतिक्विंटल प्रमोण विकला गेला. ह्या कार्यक्रमांमुळे शेतकऱ्यांच्या खिशात दोन पैसे येतील असे वाटत आहे. चांगल्या वड्या आकर्षक पॅकिंग व धुळीपासून संरक्षण ह्यामुळे व्यापाऱ्यांनी आणखी एक ट्रक गुळाची ६५० रु. प्रतिक्विंटलप्रमाणे ऑर्डर दिली आहे. ह्या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे की जर संघटनेचे पूर्वीचे सर्व कार्यक्रम काळजीपूर्वक ऐकून अमलात आणले असते तर देशातील सर्व शेतकरी फारच स्वाभिमानाने जगला असता.

आता शेतकरी संघटनेने व्यापार-शेती, निर्यातशेतीसाठी काहीतरी नियोजन करावे असे ह्या शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. ह्यामुळे शेतकऱ्यांच्या घरी दोन पैसे येतील व महात्मा गांधींच्या म्हणण्याप्रमाणे औद्योगिक खेडे होतील व खेड्यात भरभराट तर देशात भरभराट होईल व गांधींचे स्वप्न साकार होईलच.

हा शेतकरी सीताशेतीचा प्रयोगही करून पहात आहे.

प्रेषक : श्री. बाबुराव चामले,
अरसनाळ (जि. लातूर)

# उपोषणाने काय साधले?

**भास्कर बोरावके, कोपरगाव**

कांद्याचे पीक बाजारात आले आणि भाव इतके कोसळले की शेतातून कांदा काढणेसुद्धा परवडेना म्हणून खूप शेतकऱ्यांनी कांदा शेतातच नांगरून टाकला. काहींनी शेतात आढी लावली त्यांना तेथेच कोंब फुटले, ज्यांनी बाजारात आणला त्यांना त्यातून ट्रॅक्टरभाडेही देता आले नाही.

जिल्हा परिषदा प पंचायत समितीच्या निवडणुकांत सर्व राजकीय पक्ष गुंतल्यामुळे त्यांना इकडे लक्ष देण्यास उसंत नाही. निवडणुकीच्या वेळी फक्त या मेंढरांना कोणीही हाकलावीत व नंतर वाऱ्यावर सोडून द्यावीत अशी या शेतकऱ्यांची परिस्थिती. त्यांना ना कोणी वाली.

अशावेळी गप्प कसे बसावे? शेतीमालाच्या रास्त भावाकरिता आतापर्यंत विविध प्रकारची आंदोलने झाले. अशा वेळी काय करावे? शेतकऱ्यांना संघटितपणे उभे करणे व शासनाचे लक्ष या गंभीर प्रश्नाकडे वेधणे याकरिता प्राप्त परिस्थितीत मला उपोषणाचा मार्ग योग्य वाटला व निर्णय घेऊन उपोषणास बसलो.

उपोषणाचा काळही तसा खूपच प्रतिकूल. सर्व मंडळी निवडणुकांत गर्क, प्रसिद्धीमाध्यमे, वर्तमानपत्रेही निवडणुकीच्या प्रसिद्धी व जाहिरातीमध्ये दंग. शनिवार, रविवार व मतदानाचे दिवशी मार्केट बंद, जे दोन दिवस बाजाराचे होते. हजार ट्रॅक्टरची आवक. प्रत्येक ट्रॅक्टरवर तीन माणसं असे तीन हजार शेतकरी मोंढ्यावर असावयाचे. सभेकरिता मात्र दोनतीनशेच शेतकरी असावयाचे. त्या विभागातील शेतकरी संघटनेचे पाईक मात्र आवर्जून हजर असावयाचे.

भाव पडले म्हणजे आहेच शेतकरी संघटना आंदोलन करावयास, त्याचेशी आपला काय संबंध? अशी सर्व साधारण शेतकऱ्यांची भावना. आपल्याच मालाचे भावाकरिता सभा, मोर्चा, रस्ता रोको, जेलभरो अशा अगदी कमी त्रासाच्याही आंदोलनातही सहभागी व्हायची तयारी नाही, शेतकरी कमालीचा निरुत्साही. त्याला कशाचेच काही वाटत नाही. मग आपण हा खटाटोप, जीव बाजीला लावतो कोणाकरिता? कशाकरिता? याचे उत्तर अजून तरी मिळत नाही.

उपोषणाने हा प्रश्न लगेच सुटेल अशी भाबडी भावना घेवून मी उपोषणास बसलो नव्हतो. किमान या प्रश्नावर जागृती होऊन प्रश्न सुटण्याच्या दृष्टीने मार्गस्थ झाले तरी पुष्कळ मिळविले. तेवढा हेतू मात्र सफल झाला, एवढेच.

शेतकऱ्यांनीही पीकनियोजनात बदल करावयाची वेळ आली आहे. वारंवार निर्माण होणाऱ्या कांद्याच्या समस्येतून बाहेर पडून इतर तेल व डाळीची – सूर्यफूल, सोयाबीन, हरभरा, तूर अशा नगदी पिकांकडे वळले पाहिजे.

फक्त पीक पिकवून बाजारात न आणता पिकांवर प्रक्रिया करून बाजारात आणले पाहिजे. किंबहुना ज्याकरिता आंदोलन करावे लागेल अशी पिकेच कमी करावीत.

माझे उपोषण आंदोलन शरद जोशींचे मार्गदर्शन व बद्री देवकर, मोहन गुंजाळ, डॉ. निर्मला जगझाप, डॉ. अष्टेकर, स्मिता गुरव, राजु, कातड, ब्राह्मणगावचे (लासलगाव) तरुण पाईक केंडे, शिवाजी राजोळे व रामचंद्र बापू पाटील यांच्या पाठींब्यामुळेच पार पडले व पुढे शिवाजींचे उपोषण व खासदार आमदारांच्या दारात कांदा ओतणे, विद्यार्थ्यांचे गाव बंद असे विविध मार्गांने आंदोलन सर्वांनी पुढे नेले आहे. मी केवळ एक प्रतिनिधी म्हणून सुरुवात केली ठिणगी पेटवून. परंतु आंदोलन मात्र सर्वांचेच होते. मी निमित्तमात्र होतो, एवढेच.

●●●

## ६ एप्रिलला पंजाब हरियाणाचे शेतकरी दिल्लीच्या बोटक्लबवर गहू जाळणार

१७, १८ मार्च १९९२ रोजी चंडीगढ येथे किसान समन्वय समितीची बैठक समितीचे अध्यक्ष श्री. विजय जावंधिया यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या बैठकीत शासनाने परदेशातून चढ्या भावाने गहू, कापूस इत्यादी शेतीमाल आणून, तो देशांतर्गत बाजारपेठेत ओतून देशांतर्गत शेतीमालाचे भाव पाडण्याचे जे कारस्थान रचले आहे त्याचा तीव्र शब्दांत निषेध करण्यात आला.

खुल्या बाजारपेठेचा पुरस्कार करण्याच्या बाता मारीत शासन शेतीमालाचा गळा घोटणारी जुनीच धोरणे राबवीत आहे. देशातील शेतकऱ्यांना क्विंटलला २५० रुपयांहून जास्त किंमत मिळू न देणारे शासन अमेरिकेकडून मात्र क्विंटलला ५५० रुपयांहून अधिक खर्च करून गहू आयात करीत आहे. त्याबद्दलचा विरोध नोंदविण्यासाठी पंजाब व हरीयाणा या राज्यातील शेतकरी ६ एप्रिल १९९२ रोजी प्रत्येकी एक किलो गहू घेऊन दिल्लीच्या 'बोट क्लबवर' जमून त्या गव्हाची होळी करतील.


## भारत वैद्यक

एकूण पृष्ठे सुमारे ४५० (डबल डेमी)
भरपूर आकृत्या, चित्रे, पारदर्शिका.

**छापील किंमत रु. ४५०/-**
**प्रकाशनपूर्व सवलतीची किंमत रु. २७५/-**

सवलतीची मुदत - ३० एप्रिल १९९२ पर्यंत. रु. २७५/- रोख किंवा डिमांड ड्राफ्टने पाठवून आपली प्रत नोंदविण्याचा पत्ता.

**डॉ. शाम अष्टेकर,**
भारत वैद्यक संस्था
संजीवन रुग्णालय
दिंडोरी (४२२ २०२)
जि. नाशिक

# स्वदेशी अभियान - विदेशी धान्य

**— विजय जावंधिया**

अंतरराष्ट्रीय नाणेनिधीचे कर्ज, रुपयाचे अवमूल्यन, नवीन औद्योगिक धोरण या संबंधात राजकीय आर्थिक चर्चा खूप झाली आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचे दिवाळे निघाले आहे. व कर्जाचे व्याज परत करण्यासाठी कर्ज घ्यावे लागत आहे. सावकाराकडे 'पत' नसलेली व्यक्ती कर्ज मागायला गेली तर जेवढी पत कमी तेवढा व्याज दर वा अटी जास्त - अशाच आपल्या 'सुवर्ण भूमी' देशाची आजची स्थिती आहे.

आज पी. व्ही. नरसिंहराव सरकारच्या नवीन आर्थिक धोरणाची चिरफाड सुरू आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांचा खुला परवाना देऊन आंतरराष्ट्रीय नाणेनिधीसमोर भारत सरकार शरण जात आहे, अशी टीका करणारे, भारत सरकार शेतीप्रधान देशात धान्य, कापूस, खाद्यतेल ह्यांची आयात करून देशातील शेती उद्योगाला धोका पोचवीत आहे या बद्दल मूग गिळून गप्प कां बसतात? आजच्या आर्थिक धोरणावर टीका करणाऱ्यांनी देशात गेली ४३ वर्षे जे धोरण राबविले गेले ते योग्य होते का? आजच आभाळ कोसळत आले असा प्रचार करणे म्हणजे लोकांना मूर्ख बनविण्याचा प्रकार म्हणावा लागेल.

वास्तविकता ही आहे की शेतीप्रधान देशात शेतीव्यवसायाची, त्यात घाम गाळणाऱ्या कष्टकरी जनतेची उपेक्षा करून औद्योगिक विकासाचे स्वप्न रंगविणाऱ्या 'नेहरू धोरणाचा' पराजय आज आपण अनुभवत आहोत. स्व. जवाहरलालजींनाही शेवटी शेवटी नियोजनातली चूक लक्षात आली होती, बहुतेक त्यात सुधारणा करण्याची त्यांची इच्छा होती पण काळाने त्यांना संधी दिली नाही. रशियाच्या पद्धतीने मोठ्या उद्योगांच्या धोरणांचा पाठ पुरावा, उद्योगासाठी स्वस्त मजूर उपलब्ध व्हावा म्हणून धान्य स्वस्त ठेवण्यासाठी शेतीची उपेक्षा व अमेरिकेच्या पी. एल. ४८० च्या मदतीने मोठ्या प्रमाणात धान्याची आयात - हे धोरण अत्यंत घातक ठरले आहे. स्व. लालबहादूर शास्त्रींनी नेहरूंची व्यथा ओळखली असेल म्हणूनच त्यांनी खऱ्या स्वदेशी मोहिमेचे जनतेला स्मरण करून दिले. देशात अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याचे धोरण व आकर्षक किमतीचे धोरण जाहिर केले. आजही पंजाबचा शेतकरी ९० रु प्रती क्विंटल गव्हाचा सरकारी भाव व ८४ पैसे लिटर डिझल ह्याची आठवण करून देत असतो. कृषिमूल्य आयोगाची स्थापना स्व. लालबहादूरजींच्या काळात झाली होती हे विसरता येणार नाही. परंतु त्यांची कारकीर्द अल्पावधीची ठरली व त्यानंतर नेहरूकन्या स्व. इंदिराजी ह्यांची राजवट, इंदिराजींचे चिरंजीव स्व. राजीव ह्यांचे एकविसाव्या शतकाचे स्वप्न देशाच्या दिवाळखोरपणाच्या मुळात आहे हे नाकारता येणार नाही.

या सर्व पार्श्वभूमीवर आन्तरराष्ट्रीय दबावाला बळी न पडता आर्थिक व राजकीय निर्णय घेण्याच्या इच्छाशक्तीची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार हा विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे. परंतु आधुनिकतेच्या नावाखाली जर गरिबी, बेकारी, कर्जबाजारीपणाच वाढणार असेल तर त्या विकासाला अर्थ तो कोणता? गांधीवाद हा आधुनिकतेच्या विरोधी नाही असे स्पष्ट उत्तर स्व. विनोबा भावेंनी दिले आहे. त्यांना एकाने प्रश्न विचारला की गांधीवाद आधुनिक यंत्राचा विरोध करतो का? तेव्हां ते म्हणाले की गांधीवाद आधुनिक यंत्रांच्या विरोधात नाही. गांधीवाद म्हणतो की जी वस्तू आधुनिक यंत्राने तयार होते ती समाजाला स्वस्तात स्वस्त उपलब्ध व्हावयास हवी व जी वस्तू शारीरिक श्रमाने तयार होते ती वस्तु महागात महाग हवी. ते म्हणाले आधुनिकतेच्या काळात ग्लास स्वस्त हवा व दूध महाग हवे. पण आपल्या देशात उलट होत आहे. घामाच्या दामाचे महत्त्व स्पष्ट करणारा यापेक्षा सबल पुरावा कोणता? आधुनिकतेच्या नावावर चैनीच्या वस्तूंची निर्मिती, त्यांची बाजारपेठ निर्माण व्हावी म्हणून पांढरपेश्या लोकांची वेतनवृद्धी व असंघटित कामागारांची उपेक्षा आजच्या राजकीय आर्थिक गुलामगिरीचे कारण आहे.

स्वदेशी अभियानाचा पुरस्कार करणाऱ्यांनी सर्वप्रथम देशाला शेतीव्यवसायात स्वावलंबी करणाऱ्या धोरणाचा पाठ पुरावा करण्याचा आग्रह करण्याचा आग्रह धरला पाहिजे. स्व. लालबहादूर शास्त्रींनी सोमवार करण्याचे आवाहन केले होते ती मानसिकता पुनः जागृत करण्याची गरज आहे. शेतीमालाच्या मोठ्या प्रमाणावरील निर्यातीमुळे या देशाला सुवर्णभूमीचे वैभव प्राप्त झाले होते. आजही आन्तरराष्ट्रीय बाजारात खुली स्पर्धा ठेवली तर भारताचा शेतकरी स्पर्धेत कुठेच मागे पडणार नाही. परंतु अमेरिका व काही विकसित देशांचा अशा खुल्या स्पर्धेला विरोध आहे हे आपण ध्यानात ठेवले पाहिजे. अमेरिका आपल्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात सूटसबसिडी देते व आन्तरराष्ट्रीय नाणेनिधीच्या माध्यमातून भारताच्या शेतकऱ्यांच्या सूटसबसीडी रद्द करण्याची अट ठेवते. हे कां? अमेरिकेने आन्तरराष्ट्रीय बाजारात गव्हाचे भाव पाडले. ऑस्ट्रेलियाच्या पंतप्रधानांनी या वृत्तीचा तीव्र शब्दांत निषेध केला. भारत सरकारने का केला नाही? उलट, अमेरिकेकडून जास्त सवलत घेवून आम्ही १० लाख टन गव्हाची आयात करून मार्च, एप्रिल महिन्यांत पंजाबचा नवीन गहूं बाजारात येईल तेव्हा त्याचे भाव पाडण्याचे धोरण राबवीत आहोत. हे कोणते स्वदेशी अभियान? ऑस्ट्रेलियाच्या गव्हाचे भाव २२५ डॉलर प्रतीटनांचे आहेत. अमेरिकन गव्हाचा भाव १६५ डॉलर प्रती टनाचा आहे. भारताला ६५ डॉलरची सबसिडी दिली जाणार आहे. ४० ते ४५ डॉलर प्रती टन वाहतुकीचा खर्च होणार आहे. थोडक्यात, ४०० ते ४५० रुपये प्रती क्विंटलचा गहू आयात केला जाणार आहे. १९९१-९२ साली पंजाबच्या शेतकऱ्यांना २२५ रु. प्रती क्विंटल गव्हाचा भाव देण्यात आला होता. ३० टक्के खतांची

**पान ७ वर**

# गाव तेथे प्रक्रिया उद्योग

**श्री. रविंद्रसिंग रामसिंग ठकार**
**सांगळूद ता. दर्यापूर जि. अमरावती.**

१५ ऑगस्ट १९४७ ला जे स्वातंत्र्य मिळाले ते पुढारी, व्यापारी व कर्मचारी ह्या तीन लोकांपर्यंत मर्यादित आहे. दिल्लीहून वाहणारी विकासाची गंगा इंडियाच्या जिल्ह्याच्या ठिकाणापर्यंतच वाहत जाते. ती भारताच्या ग्रामीण भागात जातच नाही. कारण ही गंगा पुढारी, व्यापारी व कर्मचारी यांच्या करीताच आहे. भारतीय ग्रामीण नागरिकांकरीता नाही. इंडियाचा वित्तमंत्री भारताच्या कृषिविषयी कितीही उदार योजना आखत असला तरी त्या भातीयांना दिलेल्या भूलथापा आहेत ह्यात काही शंका नाही. कारण शेवटी तो इंडियन वित्तमंत्री आहे, भारतीय नाही.

परदेशी कंपन्यांना भारतात भांडवल गुंतवणुकीची सुविधा देणे म्हणजे येथे प्रगतीसाठी धडपडणाऱ्या लघुउद्योजकांना तिलांजली देण्यासारखे आहे. भारत हा कृषीप्रधान देश असतांना भारतात कृषिमालाची आयात करणे व येथील कृषी माल परदेशात निर्यात न करणे म्हणजे शेतीमालाचे भाव पाडून शेतकऱ्यांची लूट करणे होय. मी जर वित्तमंत्री असतो तर गाव तेथे कृषि मालावर प्रक्रीया करणारे छोटे छोटे कारखाने काढले असते. कापसाचा प्रदेश असेल तर प्रत्येक गावात कापसापासून रूई, रूई पासून सूत, सूतापासून कापड, कापडापासून तयार कपडे, तसेच सरकी पासून तेल व ढेप तयार होते. तेलापासून रिफाईंड तेल व डालडा तयार होऊ शकतो. पण ह्या देशाचे सूत्रच फार वेगळे आहे. जेथे कापूस पिकत नाही तेथे शेकडो कापड गिरण्या व ऑइल मील्स. मुंबई अहमदाबादच्या लोकांना कापसाचे झाडही माहीत नसते. म्हणून गावातली काळ्या मातीच्या उदरातून जन्माला येणारी लक्ष्मी इंडियाच्या मँचेस्टरला न जाता गावातच राहील, उन्हाळ्याच्या दिवसात काम नसल्यामुळे रिकामे राहाणारे गावातील नागरीक जोडधंद्याच्या स्वरूपात लहानसहान उद्योगात गुरफटले जाऊन बेकार रहाणार नाहीत व त्यांना आर्थिक लाभ होऊन त्यांचे राहणीमान सुधारेल. पर्यायाने, कनिष्ठ शेती उत्तम होईल व भांडवलदारांच्या खिशात जाणारा पैसा हा शेतकऱ्यांच्या खिशात जाईल. म्हणजेच गाव हा देशाच्या विकासाचा कणा बनेल, व तेव्हाच ''मेरा भारत महान होईल'' असे न केल्यास ''मेरा भारत परदेशात गहाण राहील.'' छोट्या कारखान्यांच्या स्वरूपातून शेतकऱ्यांनी निर्माण केलेल्या कच्च्या मालावर देशातच काय पण विदेशात निर्यात करायला बंदी नको ज्या ठिकाणी संत्रा, मोसंबी, द्राक्षे व इतर फळफळावळ पिकत असतील त्या ठिकाणी फळांपासून तयार होणारी दारू, ज्यूस किंवा सुका मेवा तयार करता येईल की ज्यामुळे वाहतुकीचा खर्च व डीझेल वाचेल व शेतकऱ्यांना भरपूर लाभ होईल.

जर का मी भारताचा वित्तमंत्री असतो तर माझ्या शेतकरी बंधूंना एक गोष्ट विनंतीपूर्वक सांगितली असती. ती म्हणजे, शेतकऱ्यांनी सरकारी कर्जावर, बी-बियाणे, खते व औषधे ह्यांवर आधारीत शेती करू नये; विशेष करून कोरडवाहू शेतकऱ्यांनी. कारण आपली शेती फायद्याची असती तर आपण कर्ज काढलेच नसते तर कर्ज दिले असते. सरकारला परदेशात सोने गहाण ठेवू दिले नसते. ते सोने आपण गहाण ठेवले असते. व तेव्हाच भारत, ''मेरा भारत महान ठरला असता.'' शेती ही फायद्याची राहू नये म्हणजेच जेणेकरून शेतकरी कर्ज काढत राहतील की ज्यामुळे सोसायट्या व राष्ट्रीयकृत बँकांचे व्याजाच्या स्वरूपात भले होत राहील. भारतात शेती ह्या व्यवसायासाठी सर्वात जास्त कर्ज घेतले जाते; ज्या व्यवसायात पिकाची, पावसाची, बी-बियाण्याची व औषधाचीच काय पण आलेल्या पिकाला उत्पादनखर्चावर आधारीत भावाची सुद्धा हमी नाही. मग अशा परिस्थितीत आधुनिक शेती करून स्वतःची फसवणूक का करून घ्यायची. मागच्या वर्षी उत्पन्न कमी असल्यामुळे कांद्याला जास्त भाव होता. त्यामुळे ह्या वर्षी शेतकऱ्यांनी कांद्याची जास्त लागवड केली. पीक भरपूर आले पण तीस-चाळीस पैशाच्यावर भाव नसल्यामुळे शेतकरी अडचणीत आला आहे. शेती हा ह्या देशातील असा एक व्यवसाय आहे की ज्याला विमा नाही, नुकसान भरपाई नाही, वाढीव किंमत नाही, निर्यातीची व खरेदीची व्यवस्था नाही. पण कर्जाची व्यवस्था आहे. कारण कर्ज जर घेतले नाही तर मग बँकांचे काय होणार? एक महिन्याने पंजाबमधे गव्हाची कापणी होणार आहे. पीक भरपूर आलेले आहे. पण सरकार आलेल्या गव्हाचे भाव पाडण्यासाठी अमेरिका व कॅनडाकडून १० लाख टन, महागाचा, बोटक्या व निकृष्ट गहू आणणार आहे; म्हणजेच महान भारताच्या नागरिकांसाठी आयात करणार. ही कृषीप्रधान देशाची शोकान्तिका आहे. वित्तमंत्र्यांची शेतीविषयी घोषणा म्हणजेच सावावर खोटेपणाचा आव आणून भुंकण्यासारखे आहे. म्हणूनच इंडियाची कुजलेली कृषिनिती ही शेतकऱ्यांना फार मोठा शाप आहे.

शेवटी एवढेच म्हणून इच्छितो का मी

# मी अर्थमंत्री असतो तर –

'शेतकरी संघटक' च्या ६ फेब्रुवारी १९९२ च्या अंकात एक लेखन स्पर्धा जाहीर केली होती. विषय होता 'देशाच्या कृषिइतिहासाचे पुढचे प्रकरण.' या स्पर्धेला प्रतिसाद म्हणून नियोजित २१ मार्च ही मुदत संपल्यानंतरसुद्धा येथे दाखल झालेल्या लेखांची संख्या फक्त तीन झाली. त्यापैकी एका लेखातील निवडक भाग येथे देत आहे. उरलेले लेख पुढच्या अंकात देण्यात येतील. लेखांची क्रमवारी न लावता तीनही लेखक कार्यकर्त्यांना 'प्रोत्साहन पुरस्कार' म्हणून प्रत्येकी रुपये पंचवीस पाठविण्यात येतील. स्पर्धेसाठी लेख पाठविले त्याबद्दल धन्यवाद.

– संपादक

वित्तमंत्री असतो तर शेतीवर असणारी सर्व बंधने हटवली असती व गाव हा शेतीविकासाचा मेंदू मानून गाव तिथं शेतीमालावर प्रक्रिया करणारा व्यवसाय, उद्योग व छोटे कारखाने निर्माण केले असते की ज्यासाठी कोणत्याही प्रकारची सरकारी बंधने नसती. गावा-गावात निर्माण होणाऱ्या कच्च्या मालाला देशात व विदेशात निर्यातीची बंदी नसती. आणि अशा परिस्थितीत भारतीय शेतकरी इतर देशांच्या तुलनेने उत्कृष्ट व उच्च प्रतीचा माल निर्माण करणारा शेतकरी म्हणून भारतास महान करू शकला असता. की ज्यामुळे भारतीय कच्चा माल व त्याचा निर्माता प्रसिद्धीस आला असता. पर्यायाने कनिष्ठ शेती ही उत्तम होऊन गावागावात लक्ष्मी सुखासमाधानाने नांदताना दिसली असती. दारिद्र्य नसल्यामुळे बेकरी नसती आणि बेकारी नसल्यामुळे गुन्हेगारीसुद्धा नसती आणि शेवटी कृषिप्रधान देशात कृषिराज्य निर्माण झाले असते, व कनिष्ठ शेती उत्तम झाली असती.

**पान ५ वरून**

भाववाढ, रुपयाचे अवमूल्यन - चलनवाढ या पार्श्वभूमीवर ९२-९३ च्या हंगामाचे धान्याचे समर्थन मूल्यात सरकारने जाहीर केलेली वाढ नगण्य आहे. ८० कोटी जनतेचा देश धान्यात स्वावलंबी होत नाही तोपर्यंत तो कर्जमुक्त होऊच शकत नाही. विदेशी धान्यावर जगणाऱ्या देशाला स्वदेशी अभियानाचा देखावा म्हणजे भावी पिढीची शुद्ध फसवणूक आहे.

**भीक नको, घेऊ घामाचे दाम**

# नवव्या वर्षात पदार्पण करतांना....

आज ६ एप्रिल. शेतकरी हुतात्मा दिन. १९८१ साली या दिवशी निपाणी येथे शेतीमालाच्या रास्त भावासाठी शांतपणे रस्त्यावर बसून अटक करवून घेण्यास तयार असलेल्या शेतकऱ्यांवर कर्नाटक शासनाने बेछूट गोळीबार करून बारा शेतकरी भावांचा बळी घेतला. आपल्या श्रमसिद्ध हक्कासाठी लढतालढता हुतात्मा झालेल्या या शेतकरी भावांच्या स्मृतिदिनी सर्व शेतकरी हुतात्म्यांना अभिवादन करून पाक्षिक 'शेतकरी संघटक' नवव्या वर्षात पदार्पण करीत आहे.

गेले संपूर्ण वर्ष 'शेतकरी संघटक' ला अत्यंत कठीण गेले. लेखनाच्या दृष्टीने शेतकरी कार्यकर्त्यांचा सहभाग नगण्य राहिला. गेल्या वर्षभरात देशात आणि सर्वच जगात जे बदलाचे वातावरण तयार झाले त्याचे श्री. शरद जोशींनी केलेले विश्लेषण, तसेच ते स्थायी कृषि सल्लागार समितीचे अध्यक्ष असतांना त्यांनी तयार केलेला 'राष्ट्रीय कृषिनीती' चा मसुदा वाचकांपर्यंत पोहोचविण्याची संधी 'शेतकरी संघटक' ला लाभली एवढीच त्यातल्या त्यात समाधानाची बाब. यांतील काही लेख इतके मूलगामी होते की महाराष्ट्रातल्याच नव्हे तर देशातल्या अनेक वर्तमानपत्रांनी ते लेख / त्यांची भाषांतरे प्रकाशित करून त्यांच्या वाचकांपर्यंत पोहोचविले.

गेल्या वर्षातील शेतकरी संघटनेचे महत्त्वाचे कार्यक्रम म्हणजे लक्ष्मीमुक्ती आणि नव्या युगाचे नवे आव्हान स्वीकारणारा शेतकऱ्यांचा जाहिरनामा पुढे ठेवणारा शेगावचा १० नोव्हेंबर १९९१ चा मेळावा.

परंतु 'शेतकरी संघटक' च्या मर्यादित वर्गणीदार संख्येमुळे हे दोनही अत्यंत महत्त्वाचे कार्यक्रम महाराष्ट्रातील फार थोड्या गावांमध्ये पोहोचू शकले. १९८३ साली 'शेतकरी संघटक' ची सुरुवात करतांना 'गाव तेथे संघटक' अशी महत्त्वाकांक्षा होती. परंतु, वर्गणीदार बनविण्याचे काम शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांना संघटनेचे कार्य करीत असतांनाच करावे लागल्यामुळे त्या संख्येवर मर्यादा पडली. कधी तरी एखाद्या कार्यक्रमाच्या निमित्ताने त्यांना वर्गणीदार जमविणे सुलभ व्हायचे. पण त्याने वर्गणीदारांची संख्या थोडीफार वाढायची पण गावांची संख्या तीच राही. पुन्हा, अशा निमित्ताने वर्गणीदार बनलेल्यातील फार थोड्यांकडून दुसऱ्या वर्षी वर्गणी येते. आर्थिक नफा हा 'शेतकरी संघटक' चा उद्देश कधीच नव्हता, तोट्याचा भार शेतकरी संघटना आणि कृषि योगक्षेम संशोधन न्यासाच्या मदतीने झेपता आला. पण, सर्वसामान्य शेतकऱ्यांना जड वाटणार नाही इतकी अल्प वर्गणी असतांनासुद्धा शेतकरी संघटकचे वर्गणीदार वाढून त्यातील विचार जास्त लोकांपर्यंत पोहोचविण्याचे उद्दिष्ट साध्य झालेले नाही.

'शेतकरी संघटक' ची आर्थिक स्थिती लक्षात घेऊन शेतकरी संघटनेच्या कार्यकारिणीने सप्टेंबर १९९१ मध्ये आळंदी येथे झालेल्या बैठकीत कायम निधी उभारण्याची योजना आखली. एकरकमी पाचशे रुपये निधी देणाऱ्या व्यक्तीस 'शेतकरी संघटक' चे आजीव वर्गणीदार करण्यात येऊन त्या रकमेवरील व्याजातून प्रत्येकी एक जादा अंक पाक्षिकाच्या प्रसाराकरिता वापरता येईल अशी या मागची कल्पना. त्या बैठकीत कार्यकारिणीच्या विविध जिल्ह्यातील सदस्यांनी जी आश्वासने दिली त्यानुसार त्या वर्षअखेरी किमान १५०० आजीव वर्गणीदार नोंदले जायला हवे होते. पण आजतागायत ही संख्या १६० च्या वर गेलेली नाही. नवव्या वर्षाच्या सुरुवातीला संघटकच्या वार्षिक वर्गणीदारांची संख्याही केवळ २३०० आहे.

एकीकडे आर्थिक दुबळेपण आणि दुसरीकडे व जास्त महत्त्वाचे कार्यकर्त्यांच्या लेखनसहभागाचा अभाव यामुळे कुपोषित अवस्थेत 'शेतकरी संघटक' अजूनही त्याच 'आठ पानी' स्वरूपात निघत राहील. 'शेतकरी संघटक' चे मालक श्री. मोहन बिहारीलाल परदेशी यांनी या पाक्षिकाची

Posted at Market Yard, PSO, Pune 37.
On 6th April, 1992

**SHETKARI SANGHATAK**
(Marathi Fortnightly)
Regd. No. 39926/83
April 6, 1992

**To**

**PNCW 281**
Licence to post without prepayment
**No. 87**

मालकी 'कृषि योगक्षेम संशोधन न्यासा' कडे सोपविण्याचा मानस व्यक्त केला आहे आणि 'संघटक' च्या कठीण अवस्थेतही 'न्यासा' ने ते तत्त्वतः मान्य केले आहे. काही तांत्रिक व कायदेशीर तरतुदी पुऱ्या झाल्या म्हणजे हे पाक्षिक अधिकृतपणे न्यासाच्या मालकीचे होईल.

संपादकीय विभागाच्या दृष्टीने आता संघटकवर मोठी जबाबदारी रहाणार आहे. कारण यापुढे केवळ 'ऊठ किसान घे मशाल' अशी आवाहने करायची नसून शेतीव्यवसाय स्वतःच्या जबाबदारीवर 'किफायतशीर' बनविण्याच्या दृष्टीने शेतकऱ्यांना उपयुक्त असा मजकूर देणे आवश्यक झाले आहे. शेतकरी संघटनेने चांदवडच्या महिला अधिवेशनापासून ग्रामीण भागातील स्त्रियांच्या सामाजिक स्थितीमधील परिवर्तनाची जी प्रक्रिया सुरू केली आहे त्याचे प्रातिनिधिक स्वरूप म्हणून 'लक्ष्मीमुक्ती' कार्यक्रमाचा प्रसार हा संघटकच्या यापुढील कार्याचा महत्त्वाचा भाग आहे. शेतकरी महिलांच्या रूपाने निम्मा शेतकरी समाज त्याला विनाकारणच मिळत आलेल्या दुय्यम दर्जातून मुक्त झाल्याशिवाय शेतीला आजच्या दुरवस्थेतून स्वतःच्या बुद्धीने आणि सामर्थ्याने बाहेर काढू शकणारा 'चतुरंग शेती' चा प्रयत्न सुरूच होऊ शकणार नाही. त्यामुळे 'चतुरंग शेती'च्या आर्थिक आंदोलनाबरोबरच 'लक्ष्मीमुक्ती' च्या घरगुती आंदोलनाचा प्रसार करण्याची जबाबदारी शेतकरी संघटकने घेणे हे 'संघटक' च्या मूळ उद्देशाशी सुसंगत राहील. कारण 'शेतकरी संघटक' मुळात 'शेतकऱ्यांचे लाचारीचे जिणे संपवून त्याला देशातील इतर नागरिकांप्रमाणे सन्मानाने व सुखाने जगात यावे' याकरिता चाललेल्या कार्यक्रमांसाठी सर्व शक्तीने प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा करूनच सुरू झाले आहे.

अर्थात्, या प्रयत्नांत संपादक मंडळातील सर्वांचे सहकार्य अपेक्षित आहे. 'शेतकरी संघटक' च्या संपादक मंडळात कोण कोण आहेत? जे जे कोणी शेतकरी संघटकसाठी लेख, बातम्या, संघटकमध्ये आलेल्या लिखाणावरील अनुकूल-प्रतिकूल प्रतिक्रिया, शेतीतून नफा काढण्याचा प्रयत्न करीत असतांना आलेले अनुभव आपल्या भाषेत लिहून किंवा लिहितावाचता येत नसेल तर कुणाकडून तरी लिहून घेऊन पाठवतील ते माझे सर्व भाऊ आणि बहिणी हे या संपादक मंडळाचे सदस्य असतील.

सर्व शेतकरी भावाबहिणींनी तसेच हितचिंतकांनी शेतकरी संघटकच्या संपादक मंडळात मोठ्या संख्येने सामील होऊन त्याचे कुपोषण थांबविण्यास मदत करावी असे आवाहन करून 'शेतकरी संघटक' च्या नवव्या वर्षाच्या कारकीर्दीस सुरुवात करीत आहे.

आपला स्नेहांकित,
**सुरेशचंद्र म्हात्रे**

# शेतकरी हुतात्म्यांना विनम्र अभिवादन

## नरखेड पंचायत समितीवर शेतकरी संघटनेचा झेंडा

सभापती सौ. दिप्ती काळमेघ

नरखेड पंचायत समितीच्या सभापतीपदाच्या अटीतटीच्या निवडणुकीत शेतकरी महिला आघाडीच्या सौ. दिप्ती काळमेघ यांनी महाराष्ट्राचे राज्यमंत्री श्री. रणजीत देशमुख यांच्या करोडपती समजल्या जाणाऱ्या बंधूंचा पराभव केला. गेल्या जि. प. निवडणुकीत त्या मेंढला जिल्हा परिषद मतदार संघातून याच राज्यमंत्र्यांच्या पत्नीचा पराभव करून निवडून आल्या आहेत.

नरखेड पंचायत समितीत सौ. दिप्ती काळमेघ यांच्या सोबत शेतकरी महिला आघाडीच्या सौ. सुधाताई पावडे व शेतकरी संघटनेचे श्री. योगेश पुंड व श्री. प्रमोद चाफले हेही निवडून गेले आहेत. या सर्वांच्या व इतर सदस्यांच्या सहकार्याने सभापती सौ. दिप्ती काळमेघ शेतकरी महिला आघाडीचा खऱ्याखुऱ्या विकासाचा जाहिरनामा अमलात आणतील व विकासाचा एक नवा आदर्श निर्माण करतील असा विश्वास नरखेड पंचायत समितीच्या क्षेत्रातील स्त्रीपुरूष शेतकऱ्यांना वाटत आहे.

प्रेषक : श्याम बारई, नरखेड.

**पाक्षिक शेतकरी संघटक**
**मालक – मोहन बिहारीलाल परदेशी**
**मुद्रण स्थळ – चाकण प्रिंटिंग प्रेस, चाकण**

**संपादक, मुद्रक, प्रकाशक**
**सुरेशचंद्र म्हात्रे**
फोन : द्वारा ५०६८२

**६ व २१ तारखेला प्रसिद्ध होतो.**
**प्रकाशन स्थळ व पत्रव्यवहाराचा पत्ता**
**११८७/६६ शिवाजीनगर, पुणे ४११ ००५.**